**प्रा.डॉ. सौ. नलिनी महाडिक**
प्रपाठक, संशोधक मार्गदर्शक
व मराठी विभाग प्रमुख (नि.)
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.
(महाराष्ट्र) पिन - ४१५००१

## प्रमाणपत्र

कु. बंगारी सुरेश साळुंखे यांनी " 'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' या . आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास" या विषयावर लघुशोध प्रबंध स्वतः पूर्ण केला आहे. हा लघुशोध प्रबंध विद्यापीठाच्या एम्.फिल. पदविकेसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांनी हे काम अत्यंत समाधानकारकरीतीने पूर्ण केले आहे. यापूर्वी हा अभ्यास कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही. प्रबंधातील कोणताही भाग कुठेही यापूर्वी प्रसिद्ध झालेला नाही याची मला खात्री आहे.

ठिकाण : सातारा

दिनांक :

सौ. नलिनी महाडिक

**मार्गदर्शिका**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

**PRINCIPAL J.G. JADHAV**
CHHATRAPATI SHIVAJI COLLEGE,
SATARA. (MAHARASHTRA)
PIN - 415001

# CERTIFICATE

This is to certify that, Miss. Bangari Suresh Salunkhe of this college, was a regular student of M.Phil. (Marathi) during the academic year 2009-10. To the best of my knowledge she bears a good moral character.

Place : Satara
Date :

Principal,
Chh. Shivaji College, Satara

कु. बंगारी सुरेश साळुंखे
मु. आसनगाव, पो. दहिगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

## प्रतिज्ञापत्र

" 'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास" या विषयावरील सदरचा लघुशोध प्रबंध मी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या एम्.फिल. (मराठी) पदवीसाठी सादर केला आहे. हा लघुशोध प्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : सातारा
दिनांक :

अभ्यासक
कु. बंगारी सुरेश साळुंखे
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

जिने अपार कष्ट करून मला जपले व या विश्वव्यापक जगाला
सामोरे जाण्यासाठी शिक्षणासारखी संजीवनी घेण्यासाठी प्रवृत्त केले
अशा माझ्या प्रिय आईच्या स्मृतीस,
डोळ्यांच्या ज्योतीने प्रेमाचा स्नेह देऊन
कष्टात रक्त आटविणाऱ्या,
मनस्वी स्वाभिमान जपणाऱ्या
आदरणीय वडिलांना आणि शिक्षणाच्या
संस्काराने माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास
करणाऱ्या माझ्या आदरणीय गुरूवर्यांना समर्पित ...

# भूमिका

कोणत्याही भाषेतील जिवंत साहित्यात नेहमी नवनवे प्रवाह आकारास येत असतात. नवे प्रवाह साहित्यात भर घालीत असतात आणि साहित्यातील चैतन्य टिकवीत असतात. नवे प्रवाह निर्माण झाले नाहीत किंवा नव्या जाणिवेतून लेखणी सरसावणारा लेखकवर्ग उदयाला आला नाही तर ते साहित्य बंदिस्त व दुबळे होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नव्या नव्या जाणिवेतून ज्यांनी लेखन केले त्यामुळेच तर मराठी सीहित्य समृद्ध होताना दिसते. इंग्रजांच्या कालखंडात मराठीतील बहुतेक लेखक पांढरपेशा वर्गातून पुढे सरसावले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे दृश्य पालटत चालले आहे. लिहिणे व बोलणे हे व्यवसाय आता एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले नाही. शिक्षण जसजसे समाजात पसरत चालले आहे तसतसे समाजातले उपेक्षित स्तर जागे होत आहेत. आपापले व्यापक परीघ असलेले अनुभवविश्व व्यक्त करण्याची ओढ समाजाच्या प्रत्येक घटकातून निर्माण होऊ लागली आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जे आजवरही दबले गेले आहेत, दडपले आहेत, पिळले आहेत किंबहुना विशिष्ट प्रकारच्या समाजव्यवस्थेमुळे माणूस असूनही पशूपेक्षाही हीन जीवन जगत होते, त्यांचा स्तर, त्यांची वेदना, त्यांचा विद्रोह त्यांच्याच लेखनातून व्यक्त होत आहे, याचे मराठी माणसाने स्वागत केले पाहिजे. दलित साहित्य हा मराठी साहित्यातला एक नवा प्रवाह आहे. या नव्या प्रवाहाची सुरूवात टप्प्याटप्प्याने होत गेली. प्रथम त्याचा कविता, कादंबरी, नाटक व आत्मकथन इत्यादीनुसार विकास होत गेला आणि दलितांच्या आत्मभानाला महत्त्व येऊ लागले. आत्मभान जागृत झाल्याने समाजाने अव्हेरलेल्या अशा लोकांनी आत्मकथन प्रकटीकरणाचा ध्यास घेतला. म्हणूनच दलित साहित्यात दलित आत्मकथनांची वाटचाल सुरू झाली.

आत्मकथनामध्ये नायक हा 'मी' ला स्मरून सर्व समाजाची करूणकहाणी रेखाटण्याचे काम करत असतो म्हणूनच आत्मकथनात लेखकाच्या एकट्या 'मी' विषयी तडजोड नसून समूहाशी तडजोड होताना दिसते.

अशाच प्रकारची तडजोड करणारी आत्मकथने अनेक दलित साहित्यिकांनी लिहिली त्यापैकीच समाजाने कधीच न स्वीकारलेले शरणकुमार लिंबाळे व किशोर काळे यांच्या 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला.

छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, कर्मवीर पाटील या महामानवांच्यामुळे स्वातंत्र्यानंतर दलित, भटक्या लोकांना आत्मभान आले व शिक्षणाची दारे खुली झाली.

आयुष्यभर जे भोगले, हाल अपेष्टा, शारीरिक अत्याचार, मानसिक अवहेलना, दारिद्र्य, दु:ख यांच्या वेदना सहन केल्या त्या नवशिक्षित तरूण तरूणींना हे सगळे शब्दबद्ध करण्याची जाणीव झाली. त्याच जाणीवेच्या उंबरठ्यावर असणारी मी एक नवज्योत आहे.

मी याच विवंचनांचे, दु:खाचे, कारूण्याचे, चित्रण करणारी अनेक पुस्तके वाचली. उदा. 'माझ्या जन्माची चित्तरकथा', 'तराळ-अंतराळ', 'जिणं आमुचं', 'उपरा', 'बलुतं', 'उचल्या', 'गबाळ', 'आठवणींचे पक्षी', 'काट्यावरची पोटं', 'अंत:स्फोट', 'आभरान' इत्यादी.

या आत्मकथनातील अन्याय, अत्याचार, दु:ख-वेदना, दारिद्र्य त्या-त्या नायकांची दयनीय वास्तवता या सर्व गोष्टींच्या इंगळ्या माझ्या मनाला सतत डसत राहिल्या. वारंवार होणाऱ्या माझ्या मनातील घालमेल मला अस्वस्थ करीत असे.

दलित साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर टाकली आहे. कविता, कथा, नाटकांप्रमाणे दलित आत्मकथनांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर झाली. या आत्मकथनांनी मराठी साहित्य समृद्ध केले. अतिशय प्रतिकूल वातावरणामध्ये हिंदू संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर या लेखकांनी जो जीवन संघर्ष केला व यशाची चिकाटी बाळगली त्या दु:खद प्रसंगाचा शब्दप्रपंच त्यांच्या आत्मकथनात येतो. सर्व दलित जगतालाच ही आत्मकथने प्रेरणादायी ठरतात.

सवर्ण समाजाच्या आधाराने, त्याच्या दबावाखाली, त्याची सेवाचाकरी करत पशूवत जगणाऱ्या दलित समाजातील स्त्रीवर्गाला श्रमाच्या दास्याबरोबरच शीलाचेही

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मोल सवर्ण बलवत्तरास द्यावे लागते तेव्हा 'अक्करमाशी'चा जन्म काहींवर लादला जातो. शरणकुमार लिंबाळे यांच्या भाळी अशा स्वरूपाचा 'अक्करमाशी' हा शिक्का आला. त्यानुसार त्यांच्या जीवनाला जन्मापासूनच भोगवटा आला ती हकिकत त्यांच्या आत्मकथनात 'अक्करमाशी' शीर्षकाखाली समाजापुढे आली.

सवर्ण समाजाचे मनोरंजन करून पोटाची खळगी भरून जगणाऱ्या कोल्हाटी समाजातील स्त्रीला मनोरंजनाबरोबरच आपले स्त्रीत्वही जेव्हा गहाण टाकावे लागते. तेव्हा तिच्या पोटी जन्माला येणाऱ्या दुर्दैवी किशोरला फक्त आईचे नावच लावता येते या वास्तवाची कर्मकहाणी 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनात लिहिणारे किशोर शांताबाई काळे सांगतात.

'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' ही दोन दलित आत्मकथने आहेतच शिवाय प्रस्थापित समाजाच्या व्यवस्थेने अनौरस आणि अनैतिकतेतून जन्मलेले म्हणून तिरस्कृत ठरविलेल्या व्यक्तींची आहेत. बालपणापासूनच तारूण्याच्या तिशीपर्यंतच्या जीवनात त्यांच्याविषयी घडलेल्या व्यथा-वेदनांचा सुस्पष्ट आलेख त्यातील सखोलतेसहित या आत्मकथनात आलेला आहे. स्वत:वर कुटुंबाने व समाजाने लादलेल्या गोष्टी, केलेला अन्याय, दिलेला त्रास, घेतलेले श्रम यांच्या तपशिलातून अभिव्यक्त झालेली लेखकांची व्यक्तिमत्त्वे त्यांच्या प्रतिक्रियेसहित या आत्मकथनांतून उमटलेली आहेत.

दोन्ही आत्मकथनात अनेक साम्यघटक आहेत. तरीही भाषा, व्यक्ती, प्रदेश, स्थळ, जात यांच्या भेदानुसार तफावत आहे. त्यामुळे या दोन्ही आत्मकथनांच्या तुलनात्मक अभ्यासास संधी होती. एक आव्हानही होते. या विषयावर यापूर्वी कोणी संशोधनात्मक अभ्यास केलेला नव्हता. मराठी साहित्यात आत्मकथनाच्या दालनात महत्त्वपूर्ण भर घालणाऱ्या व वाचक, साहित्यिक व अभ्यासकांना प्रेरणादायी ठरणाऱ्या या दलित आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास हा माझ्या संशोधनाचा विषय ठरविण्यामागील भूमिका निर्माण झाली.

# ऋणनिर्देश

डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मोलाचा संदेश दिला. दु:ख, दैन्य आणि दास्य ज्या समाजाने शतकानुशतके भोगले त्या समाजाची अस्मिता जागृत करण्याचे काम या नेत्याने केले. अन्याय करण्याचे हात थकतात आणि ज्याच्यावर अन्याय होतो त्याची शक्ती वाढत असते. आत्मबल हेच श्रेष्ठ बल !

भारताच्या सामान्य जनतेला प्रत्येक क्षणाला अपमान सोसावा लागतो. अन्याय, अत्याचार सहन करावा लागतो. 'न्याय देण्यासाठी मी प्रसंगी कायदाही बाजूला सारीन' अशी ग्वाही देणारे पण न्याय कधीच न देणारे गुरू या देशात जागोजाग आढळतात. 'न्याय देणे' आणि त्यांच्या जीवनात आशेचा किरण तेवत ठेवण्याची भाषा करणे यात मोठेपण आहे. आज अन्याय, अत्याचार, छळ, पिळवणूक हा युगधर्म बनला आहे.

अन्याय, अपमान, अप्रतिष्ठित जीवन जगणाऱ्या समाजात माझा जन्म झाला. मी नाही परंतु माझ्या समाजाने या यातनामय नरकाचा अनुभव घेतला. या नरकमय यातना कशा असतील ? या यातनांचा शोध घ्यावा असे वाटले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने अनेक तरूण-तरूणी प्रेरीत झाले. विचारांची मशाल हाती घेऊन चालणारी मी एक ज्योत आहे. ज्योतीने ज्योत पेटवली तर अंध:कार नाहीसा होऊन सभोवतालचा परिसर प्रकाशमान होतो. अशाच प्रकारच्या समाजात खडतर प्रसंगांना तोंड देत जगणाऱ्या दलित बांधवांनी लिहिलेले साहित्य माझ्या वाचनात आले.

दलितांनी लिहिलेले साहित्य वाचून माझ्या मनात त्यांच्याविषयी करूणेची भावना निर्माण झाली. कारण या दलितांनी आपले आत्मभान जागृत ठेवून आपले पूर्वायुष्याचे वास्तव दर्शन घडवले. त्यांच्या पूर्वायुष्यातील वास्तवात त्यांना खाचखळग्यांशिवाय काहीच वाट्याला आले नाही. यातूनच आत्मकथन हे साहित्य निर्माण झाले आणि म्हणूनच मी माझा अभ्यास विषय 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास असा विषय निवडला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

मी ज्या समाजात जन्मले तो समाज बाबासाहेबांनी जागृत केलेला दलित समाज. त्या समाजातील लेखकांनी लिहिलेल्या साहित्याकडून मला नेहमीच काहीतरी चांगले घडविण्याच्या प्रेरणा मिळतात. एम.फिल. चा विषय निवडण्यामागेही ती प्रेरणा महत्त्वाची आहे.

'' 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांचा तुलनात्मक अभ्यास'' हा विषय एम.फिल. च्या शोधप्रबंधासाठी निवडण्यामागे माझ्या मार्गदर्शिका डॉ.प्रा.सौ. नलिनी महाडीक यांचे मार्गदर्शन मिळाले व हा विषय निश्चित केला.

एम.फिल. चा शोधप्रबंध पूर्ण करताना मला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. माझ्या आईवडिलांचा अथक परिश्रमामुळे शिक्षण घेऊ शकले. त्यांचे ऋण कधीच न फिटणारे आहे. तसेच माझ्या मार्गदर्शक डॉ.प्रा. नलिनी महाडीक यांचे मार्गदर्शन फार मोलाचे ठरले. त्यांनी मला फक्त मार्गदर्शनच केले नाही तर माझ्या अडचणी समाजावून घेऊन मला हा शोधप्रबंध पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले. म्हणूनच हा शोधप्रबंध वेळेत पूर्ण होऊ शकला. त्यांनी शोधप्रबंध लिहित असताना संदर्भग्रंथ मिळवून देण्यापासून वेळोवेळी चर्चा करून मार्गदर्शन केले. त्यांनी केलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि दिलेले प्रोत्साहन कसे विसरता येईल ? प्रस्तुत संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शिवाजी कॉलेजचे प्राचार्य श्री. जे.जी. जाधव यांनी प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांचीही मी ऋणी आहे.

माझ्या मार्गदर्शकांचे मोलाचे सहकार्य तर लाभलेच पण त्याचबरोबर माझा मित्र नाथाजी गायकवाड यानेही मला प्रत्येक अडचणीत पुस्तके देऊन जे सहकार्य केले तेही फार मौलिक ठरले. पुस्तकाविना माझा शोधप्रबंध पूर्ण होणे शक्यच नव्हते. त्यांनी मला जी सहानुभूतीपूर्वक मदत केली ती मी कशी विसरू शकेन ? आणि शिवाजी कॉलेजच्या ग्रंथालयातील श्री. पावसकर सर, खान सर यांनी मला हवी ती पुस्तकं देऊन शोधप्रबंध पूर्ण करण्यास मदतच केली आहे. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यापलीकडे मी काय करू शकते ?

या लघुशोधप्रबंधाचे टायपिंग वेळेत व योग्य रीतीने करून देणारे मून टायपिंग ॲण्ड झेरॉक्स सेंटरचे श्री. इम्रान शेख यांचे आभार मानने माझे कर्तव्य आहे व त्यांच्या कामाबद्दल मला आदरही आहे.

अठराविश्वे दारिद्र्याने व्याकुळ झालेल्या आणि अज्ञानाच्या अंध:कारात जखडलेल्या माझ्या आईवडिलांना साक्षर म्हणजे काय ? हे माहित नव्हते. तर मग 'एम.फिल.' या संज्ञेचा अर्थही जाणून घेण्याच्या फंदात न पडता मला प्रवेश घ्यायला सांगितला. आपल्या मुलीचे पुढचे शिक्षण चालले आहे एवढेच कळण्याइतपत शिक्षणविषयक ज्ञान असणाऱ्या माझ्या आईवडिलांनी मला त्यांच्याकडून करता येईल तेवढे सहकार्य केले. तेच त्यांनी मला दिलेले आशीर्वाद आहेत.

यात दु:खद गोष्ट अशी की, एम.फिल. ला सुरूवात करताना माझ्यावर मायेची पाखर घालणारी माझी आई कॅन्सरमुळे मरण पावली. काळ कोणासाठीच थांबत नाही. काही नैसर्गिक, काही व्यावहारिक घटना घडून गेल्या. माझ्या विवाहाचीही घटना घडली. त्यात सुखद भाग हा की, माझे पती श्री. युवराज पवार माझ्या शैक्षणिक कामात सहकार्य व प्रोत्साहन देणारे मिळाले.

वडिलांचे कर्तव्य व प्रेम देणाऱ्या माझ्या वडिलांनी आईच्या प्रेमाची उणीव जाणवू दिली नाही. मी माझे पिता आणि पती यांच्या भूमिकेबद्दल कृतज्ञच राहीन.

माता-पिता-गुरू, मित्र-मैत्रिणी, स्नेही आणि सहकारी सर्वांचे ऋण सहकार्य व प्रेमातून मी स्वीकारले. सर्वांचाच व्यक्तिश: नामनिर्देश येथे करता येत नसला तरी त्यांची मनोमन नोंद आहे. आतापर्यंत प्रवास यांच्यामुळे यशस्वी झाला. यापुढेही त्यांच्या सहकार्याची अपेक्षा ठेवते आहे.

**कु. बंगारी सुरेश साळुंखे**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण १** | **दलित आत्मकथनांची वाटचाल** | **१ - २८** |
| | - दलित साहित्य प्रेरणा व स्वरूप | ३ |
| | - दलित आत्मकथने व्याख्या व स्वरूप | १६ |
| | - दलित आत्मकथनांची ठळक वैशिष्ट्ये | १९ |
| **प्रकरण २** | **'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' या दलित आत्मकथनांचा परिचय** | **२९ - ५०** |
| | - 'अक्करमाशी' | |
| | अ) लेखक परिचय | २९ |
| | ब) 'अक्करमाशी' चा परिचय | ३१ |
| | - 'कोल्हाट्याचं पोर' | |
| | अ) लेखक परिचय | ३७ |
| | ब) 'कोल्हाट्याचं पोर' चा परिचय | ३९ |
| **प्रकरण ३** | **'अक्करमाशी' 'कोहाट्याचं पोर' चा तुलनात्मक विचार** | **५१ - ९८** |
| | - सामाजिक स्थिती | ५३ |
| | - जातीस्तरांचे जीवन | ६४ |
| | - अस्पृश्यतेचे कुरूप दर्शन | ६७ |
| | - सण - उत्सव - प्रथा - श्रद्धा - अंधश्रद्धा | ७३ |
| | - कौटुंबिक स्थिती | ७७ |
| | - स्त्री जीवन | ८० |
| | - दलित आत्मकथनांच्या प्रेरणेचा जीवनावर काय परिणाम झाला ? | ९२ |

| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण ४ | **भाषिक विशेषांचा तुलनात्मक विचार** | ९९ - ११७ |
| | - ग्रांथिक भाषा | १०१ |
| | - बोलीभाषा | १०३ |
| | - प्रादेशिक भाषा | १०६ |
| | - स्त्रीजीवन चित्रणातील भाषिक विशेष | ११२ |
| प्रकरण ५ | **उपसंहार** | ११८ - १२३ |
| | - उपरोक्त प्रकरणातील संशोधनात्मक लेखनावरून शरणकुमार लिंबाळे व किशोर काळे यांच्या आत्मकथनांचे निष्कर्ष | |
| परिशिष्ठ | **संदर्भग्रंथ सूची** | १२४ - १२७ |


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.